धक्का!!
सुराज्य सोलापूर
शनिवार, दि. ३० मार्च २०२४ । पान १२



## तोल मोल के बोल



**अजित पवारांनी वाईट काळात आपल्याला ताकद दिली. त्यांनी मला साथ दिली. पण जिल्ह्याच्या राजकारणात काही लोकांनी मला त्रास दिला. माझ्या समर्थकांना नोकरीवरून निलंबित केलं जात आहे. ज्या ज्या वेळी एखाद्याचा अहंकार टीपेला पोहोचतो, त्या त्या वेळी त्यांचा शेवट झाला आहे. रावणानेही अहंकार दाखवला, त्याचा नाश झाला. जिल्ह्यातील काही नेत्यांना सत्तेचा अहंकार झाला आहे, त्यांच्याकडे यंत्रणा आहे. पण माझ्याकडे जीवाभावाचे लोक आहेत. त्यांच्या जोडीने हा अहंकार गाडून टाकू.**

– नीलेश लंके, आमदार, पारनेर

# मराठ्यांची तुतारी!

## हद्दपार विरोधक अन् सत्ताधारी

✔ सोलापूर/खास प्रतिनिधी



**महायुती आणि महाविकास आघाडी यांच्या उमेदवाऱ्यांसंदर्भात मागील कित्येक दिवसांपासून माढा लोकसभेच्या मतदार संघातील निर्माण झालेला तिढा सुटण्याचं नाव घेत नाही. ज्या तिढ्यानं माढा हा राज्याच्याच नव्हे, तर राजधानी दिल्लीच्या चर्चेत आहे. दरम्यान, माढ्याच्या मुलूखात आता वेगळाच तिढा निर्माण झालाय. लोकसभेच्या निवडणुकीसाठी सकल मराठ्यांनी सत्ताधारी आणि विरोधी यांच्याभोवती आरक्षणावरून कारणावरून वेढा घातलाय. मराठ्यांचा स्वतंत्र उमेदवार उभा करून त्याच्या पाठीशी या समाजाचं साधारण चार ते साडेचार लाखांचं मताधिक्य उभा करून या मतदार संघातून सत्ताधारी आणि विरोधक यांना हद्दपार करण्याचा विडा मराठ्यांनी उचललाय. एवढंच नव्हे तर मराठ्याच्या पहिल्या खासदाराचा गुलाल महाराष्ट्रात सर्वप्रथम माढ्यात उधळायचा अशी ललकारी देत त्यांनी निर्धार केलाय.**

विशेषत्वे, सकल मराठ्यांना आरक्षण देण्यावरून सत्ताधारी आणि विरोधक यांनी केलेलं राजकारणाचं बुमरँग लोकसभा निवडणुकीत त्यांच्याच अंगलट येणार हे आता निश्चित आहे. भाजपानं उमेदवारी डावलल्यानंतर शरद पवार राष्ट्रवादी गटाकडून तुतारी या चिन्हावर मोहिते-पाटील हे लढण्याच्या तयारीत असतानाच, 'अब की बार सत्ताधारी और विरोधक आरपार'ची तुतारी मराठ्यांनी फुंकली आहे. माढा लोकसभेच्या मतदार संघात मराठा समाजाचा उमेदवारी उभा करण्याच्या पार्श्वभूमीवर, काल माळशिरस इथं खास बैठक पार पडली. माण, खटाव, फलटण, सांगोला, माढा, माळशिरस आणि पंढरपूर या तालुक्यातील साधारण ११ हजार मराठा मावळे या बैठकीला उपस्थित होते. या समाजाचा स्वतंत्र उमेदवार उभा करून निवडून आणण्याच्या निर्धाराची शपथ इथं यावेळी घेण्यात आली.

### मराठा मावळे म्हणाले, आता लढुया फक्त जातीसाठी !

आजवर आपल्या मातीसाठी तसेच नेतेमंडळींसाठी इमान राखत प्रत्येक वेळी काम केलं. पण आता नाही. जे काही करायचं ते आपल्या मराठा जातीसाठी, आपल्या समाजासाठी, आपल्या लोकांसाठी असाच निर्धार व्यक्त करीत उपस्थित मराठा मावळ्यांनी लोकसभेला पूर्ण ताकद लावून जातीचा स्वाभिमान म्हणून आपला समाजाचा खासदार निवडून आणण्याचं ठरविलं.

### विजयाचं असं मांडलं गणित

माढा लोकसभेच्या माण,खटाव, फलटण, सांगोला, माढा, करमाळा आणि माळशिरस या तालुक्यात साधारण मराठा समाजाच्या मतांची संख्या सहा लाख आहे. पाच लाखांपर्यंत मतदान पोलिंग होईल. जातीचा स्वाभिमान म्हणून सर्व मराठा मतदार आपल्या समाजाच्या उमेदवाराच्या पाठीशी मताचं बळ उभार करतील. साधारण चार ते साडेचार लाखाच्या फरकानं मराठा समाजाचा उमेदवार निश्चितपणं विजयी होईल, असं गणित घालून मराठ्यांनी काम सुरू केलं आहे.



### 'असा' ठरणार मराठ्यांचा उमेदवार

'मराठा जातीची स्वाभिमानी लढाई' ही टॅगलाईन लोकसभेच्या निवडणुकीसाठी असणार आहे. माढा मतदार संघातून लोकसभेला लढण्यासाठी या समाजामधील साधारण २०० जण इच्छुक आहेत. या संबंधितांचे फॉर्म भरून घेण्यात आले आहेत. मराठा समाजासाठी आजवर काय कार्य केलं? भविष्यात या समाजासाठी काम करण्याचं कोणतं व्हिजन तयार आहे? निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, लढण्याच्या पातळीवर सक्षमतेची कोणती गुणवैशिट्ये आहेत? यासंबंधीची तपशीलवार माहिती फॉर्मद्वारे भरून घेण्यात आली आहे. हे फॉर्म मराठा योद्धे मनोज जरांगे-पाटील यांच्याकडे सादर करण्यात येतील. येथे या फॉर्मची पडताळणी होऊन, इच्छुकाची सर्वच आघाड्यांवर सक्षमता पाहून, प्रमुखांशी चर्चा मनोज जरांगे-पाटील हे माढ्याच्या मराठा उमेदवाराची घोषणा करतील.

---

# आठवले गटाने भाजपची वंचितने काँग्रेसची चिंता वाढवली!

**वंचित बहुजन विकास आघाडीची एकले चलोची भूमिका आणि रिपाइं आठवले गटाने युतीत महत्त्व न दिल्याबद्दल व्यक्त केलेली नाराजी याचा मोठा परिणाम सोलापूर लोकसभा मतदारसंघावर होणार आहे. वंचितने जर सोलापुरात प्रणिती शिंदे यांना पाठींबा दिला तर त्यांच्यासमोरील आव्हान मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. मात्र विरोधात उमेदवार दिल्यास याही आव्हानाला त्यांना सामोरे जावे लागणार आहे. राजाभाऊ सरवदे यांची समजूत आठवले कशी काढणार आणि कार्यकर्त्यांना काय संदेश देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यावर भाजपची मदार आहे.**

रिपाइं आठवले गटायावतीने गेली दोन महिन्या पूर्वी सोलापूर येथे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय मंत्री रामदास आठवले आणि प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या उपस्थितीमध्ये जो मेळावा झाला, त्यात रामदास आठवले यांनी सोलापूरची जागा राजाभाऊ सरवदे यांच्यासाठी सोडावी व शिर्डीची जागा मी लढवणार आहे मला सोडावी. या दोन जागा भाजपने आम्हाला सोडाव्यात, अशी मागणी केली होती त्यानंतरही सांगली येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये रामदास आठवले यांनी पुन्हा या दोन जागांची मागणी केली होती वास्तविक रिपाइं आठवले गटाचे महाराष्ट्रासह संपूर्ण देशभर कार्यकर्ते आहेत रिपाइंने गेली दहा वर्षापासून युतीचा धर्म पाळून नेत्यापासून कार्यकर्त्यांपर्यंत सर्वांनी निवडणुकांमध्ये एक दिलाने पक्षांचा प्रचार केला आहे पण आतापर्यंत रामदास आठवले यांनी आपल्या पक्षाची ताकत वाढण्यासाठी आपल्या पक्षाला तीन खासदारकीचे तिकीट व आमदारकींची उमेदवारी देणे गरजेचे असल्याचे वारंवार सांगून सुद्धा त्याकडे भाजपाने दुर्लक्ष केल्याने रिपाइं कार्यकर्त्यांमध्ये असंतोष खदखदत आहे. आता रिपाइं सतत खासदारकीसाठी शिर्डी आणि सोलापूरच्या जागेसाठी सतत पाठपुरावा करत असतानाही त्यांच्या मागणी बाबत कोणताही निर्णय घेतला नाही अथवा या पक्षाशी कोणतीही चर्चा केली नाही त्यामुळे रिपाइं आठवले पक्षाचे कार्यकर्त्यांमधून नाराजी व्यक्त होत आहे. भाजप व महायुती जर आमच्या पक्षाला किंमत देत नसेल पक्षाचा मानसन्मान ठेवत नसेल तर येणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये प्रचार यंत्रणेमध्ये भाग न घेता अथवा उमेदवार उभे करून आपली ताकद दाखवावी अशी मागणी रिपाइं आठवले पक्षाच्या कार्यकर्त्यांमधून केली जात आहे. जर भाजपा युतीचा धर्म पळत नसेल भाजपाच्या नेत्यांना महायुतीमध्ये पूर्वी नसलेल्या मनसेबरोबर चर्चा करायला वेळ आहे राष्ट्रीय समाज पक्षाबरोबर एका दिवसात चर्चा करून त्या पक्षालाही खासदारकीची एक जागा देण्यात आली मग रिपाई पक्षाबाबत भाजपा असे धोरण का राबवत आहे अशी कार्यकर्त्यांमधून विचारणा केली जात आहे.



वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडीवर टीका करत स्वतंत्र म्हणजेच 'एकला चलो'ची भूमिका घेतली आहे. त्यांनी आठ ठिकाणी आपले उमेदवार उभे केले. त्यामुळे महाविकास आघाडीचे टेन्शन वाढले. वंचित बहुजन आघाडीच्या या भूमिकेचा सोलापुरात काय परिणाम होणार याची आतापासूनच चर्चा सुरू झाली. दुसरीकडे प्रकाश आंबेडकर यांनी काँग्रेसला सात जागांवर पाठिंबा देऊ असे घोषित केल. त्यामध्ये सोलापूर असेल का याची उत्सुकता आहे.



महाआघाडीमध्ये वंचित सहभागी होणार की नाही याबाबत गेल्या दीड महिन्यापासून चर्चा सुरू होती. वंचितने मागितलेल्या जागा महाविकास आघाडीला मान्य नव्हत्या तसेच त्यांनी दिलेल्या जागा वंचितला मान्य नाहीत. अखेर वंचितने महाआघाडीपासून फारकत घेण्याचा निर्णय घेतला. बुधवारी वंचितचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी आठ जागांची पहिली यादी घोषित केली आहे. आता महाआघाडीपुढे पेच प्रसंग निर्माण झाला आहे. मागील लोकसभा निवडणुकीचा विचार केला तर वंचित आघाडीच्या उमेदवारामुळे काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे अनेक उमेदवार पडल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जाते. गेल्या वेळेस वंचितच्या जवळपास दहा उमेदवारांना सुमारे पावणे दोन लाखांपासून ते तीन लाखांपर्यंत मते मिळाली होती. याचा फटका पूर्णपणे काँग्रेस, राष्ट्रवादीला बसला आणि फायदा त्यावेळच्या महायुतीत असलेल्या भाजप आणि सेनेला झाला. त्यामुळे यंदा वंचितला आपल्यासोबत घेण्याचा प्लॅन आघाडीने रचला मात्र जागा वाटपात फिस्कटल्यामुळे वंचित आता आघाडीतून बाहेर पडली आहे. दुसरीकडे वंचितने काँग्रेसला सात ठिकाणी पाठिंबा देण्याचे जाहीर केले आहे. यवंचितने सोलापुरात काँग्रेसला पाठिंबा दिला तर येथील उमेदवार प्रणिती शिंदे यांना दिलासा मिळणार आहे. वंचितने जर सोलापुरात उमेदवार देण्याचा निर्णय घेतला तर प्रणिती शिंदे यांच्यासमोर नवे आव्हान उभे राहणार आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत प्रकाश आंबेडकर सोलापुरातून लढले होते त्यांना सुमारे पावणेदोन लाख मते मिळाली याचा फटका सुशीलकुमार शिंदे यांना बसला होता.

---

# सोलापूर, माढ्यावर 'वॉर रुम'ची नजर!



**माढा आणि सोलापूर या दोन्ही लोकसभेच्या भाजपाच्या उमेदवाऱ्या उपमुख्यमंत्री तथा पार्लमेंटरी बोर्डाचे महाराष्ट्राचे सदस्य देवेंद्र फडणवीस यांच्या मर्जीमधील असल्याने या दोन्ही मतदार संघांवर त्यांचे निवडणुकीत विशेष लक्ष असणार आहे. या ठिकाणचे उमेदवार कोणत्याही परिस्थितीत निवडून आणण्यासाठी त्यांच्याकडून खास प्रयत्न होऊ शकतात. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, वॉर रूम स्थापित केली जाणार आहे. त्यामधून सोलापूर आणि माढा या दोन मतदार संघावर देवेंद्र फडणवीस यांचे लक्ष असणार असल्याची माहिती समोर आली आहे.**

विशेषत्वे, माढ्यातून विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर आणि सोलापुरातून आमदार सातपुते यांच्या विजयासाठी फडणवीस यांच्या नेतृत्वाचा कस लागणार आहे. येथील दोन्ही उमेदवार निवडून येणे त्यांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे.

विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना देवेंद्र फडणवीस यांनी प्रचंड मोठी ताकद दिली. माढा मतदार संघात त्यांचं बस्तान पक्कं व्हावं यासाठी रस्ते, पाणी, वीज तसेच खास करून जलसिंचनाच्या योजना, प्रलंबित रेल्वे प्रकल्प यासाठी फडणवीस यांनी नाईक-निंबाळकर यांच्यासाठी झोळी रिती केली. खासदार नाईक-निंबाळकर यांनीदेखील माढ्यातील विकास कामांसाठी सुवर्णसंधी समजून खूप काही योगदान दिलं. यातून नाईक-निंबाळकरांसाठी खासदारकीची दुसरी इंनिग फडणवीस यांनी दिली. प्रसंगी भाजपामधील मोहिते-पाटील यांच्या दबावतंत्राला फडणवीस यांनी जुमानले नाही. उमेदवारीच्या टप्प्यावरदेखील नाईक-निंबाळकर यांच्या पाठीशी मोठी ताकद लावली. शिवाय तरुण, तफदार त्यापेक्षा विद्यार्थी परिषदेच्या कुशीत अन् मुशीत वाढलेलं एकनिष्ठ नेतृत्व हेरुन आमदार राम सातपुते यांना देवेंद्र फडणवीस यांनी माळशिरसमध्ये आणून आमदार केले. तसं तर राम सातपुते हा चेहरा माळशिरस तालुक्यासाठी उपरा होता. तरीपण फडणवीस यांनी मोहिते-पाटील यांच्यासह अनेकांशी अनेक राजकीय तडजोडी केल्या आणि सातपुते यांना आमदारकीला निवडून आणलं.आमदार राम सातपुते यांनी मिळालेली संधी त्यापेक्षा देवेंद्र फडणवीस यांच्या भाजपामधील सर्व वरिष्ठांबरोबरच मतदार संघामधील मतदारांच्या विश्वासाला तडा न जाऊ देता येथे विकास साधला. पादर्शक आणि गमितान कामातून आमदारकी काय असते? कशी असू शकते? लोकाभिमुख आमदारकी कशी ठरू शकते ? हे दाखवून दिलं.

आमदार सातपुते यांनी हे जे केलं त्याचं बक्षीस म्हणून सोलापूर लोकसभेची उमेदवारी देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या पुड्यात टाकली आहे. एकूणच महाराष्ट्रातील ज्या लक्ष्यवेधी उमेदवाऱ्या आहेत, त्यापैकी माढा आणि सोलापूर इथल्या उमेदवाऱ्यांवर फडणवीस यांचे खास लक्ष असणार आहे.

---

# कदमांचा 'हात' प्रणितींना साथ





मोहोळचे माजी आमदार रमेश कदम हे राजकारणात पुन्हा सक्रीय झाले. लोकसभेची निवडणूक त्यांच्यासाठी राजकारणाच्या ट्रॅकवर येण्यासाठी चालून आलेली संधी. या निवडणुकीत स्वत:च्या गटाची ताकद दाखवून देण्यासाठी कदम हे सज्ज झाले. आपल्या सर्व कार्यकर्त्यांची मोळी बांधून तयार असलेले कदम सुशीलकुमार शिंदे यांच्या संपर्कात आहेत. पडत्या काळामध्ये केलेल्या सहकार्याची परतफेड आणि भविष्यात उज्वल राजकारणाची दिशा या पार्श्वभूमीवर ते प्रणिती शिंदे यांच्या विजयासाठी ताकद लावतील.

माजी आमदार कदम यांचे गटाचं कार्यकर्ते देखील ॲक्टीव्ह झालेत. निवडणुकीसाठी सज्ज असलेल्या कार्यकर्त्यांची बैठक घेऊन कदम यांनी मतंदेखील जाणून घेतली. आपण म्हणाल त्या सोलापूर लोकसभेच्या आखाड्यामधील उमेदवाराच्या पाठीशी बळ उभा करु, पण विधानसभेला या संबंधित उमेदवाराने सहकार्य करायला हवं असा सूर आळविला. मागील विधानसभेला माजी आमदार रमेश कदम हे अण्णा भाऊ साठे आर्थिक विकास महामंडळातील गैरव्यवहार प्रकरणी तुरुंगात होते. तरीही त्यांनी साधारण २५ हजार मते घेतली होती. कदम समर्थक गटाची तालुक्यात व्होट बँक आहे. ती प्रणिती शिंदे यांना मिळावी, यासाठी सुशीलकुमार शिंदे प्रयत्नशील आहेत. त्यांच्यात चर्चा झाली असून त्यांना सहकार्य करण्याची भूमिका कदम घेणार आहेत, लवकरच सुशीलकुमार आणि प्रणिती यांच्या उपस्थितीत मेळावा घेऊन प्रणितींना आपल्या कार्यकर्त्यांच्या मताची व्होट बॅंक देण्याचा निर्धार व्यक्त करणार आहेत, अशीही माहिती पुढं आली आहे.

**कार्यकर्ते म्हणताहेत 'तुतारी' घ्या! :** रमेश कदम यांनी आपल्या गटाच्या प्रमुख कार्यकर्त्यांची मतं जाणून घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा आगामी विधानसभा निवडणुकीसाठी गॉडफादर कदम यांनी शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटात प्रवेश करुन तुतारीच्या चिन्हावर विधानसभा लढावी, असा आग्रह त्यांच्याकडून धरला जात आहे.

---

# लोकसभेला सोपलांच्या नेतृत्वाची दिव्य परीक्षा





**बार्शी तालुक्याच्या राजकारणामधील मोठं प्रस्थं म्हणजे माजीमंत्री दिलीप सोपल. मात्र, बदलती राजकीय समीकरणं, फाटाफुटीच्या राजकारण, नेतृत्व बदलाचं तालुक्यात आलेलं वारं यामध्ये सोपल यांचा सध्याचा राजकीय आणि सामाजीक क्षेत्रातील प्रवास तसा खडतर आणि प्रतिकुल असा मानला जातोय. त्यांच्या या अडचणीच्या काळात धाराशीव लोकसभेची निवडणूक होतेय. या निवडणुकीत त्यांच्या नेतृत्वाची दिव्या परीक्षा होणार आहे. महाविकास आघाडीच्या मेळ घालून विद्यमान खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या पाठिशी बार्शी तालुक्यातून जादाचं मताधिक्य लावण्याचं मोठं आव्हान सोपल यांच्यापुढं आहे.**

तालुक्यात सर्व सत्ताकेंद्रावर मजबुत पकड निर्माण केलेल्या तसेच भाजपा सरकारचा वरदहस्त लाभलेल्या आमदार राजेंद्र राऊत यांना लोकसभेच्या निवडणुकीत टक्कर देणे सोपे नाही याची जाणीव माजीमंत्री दिलीप सोपल आणि विश्वास बारबोले यांना आहे. तालुक्यात लोकसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचा वरचष्मा निर्माण करावयाच्या दृष्टीने विद्यमान खासदार ओमराजे निंबाळकर यांची लवकर घोषीत झालेली उमेदवारी व चांगली प्रतिमा आणि जनसंपर्क यांचा सोपल, बारबोले व महाविकास आघाडीला अप्रत्यक्षपणे फायदा होणार आहे. निंबाळकर यांची उमेदवारी हे तालुक्यात सोपल, बारबोले यांच्यासाठी बलस्थान आहे. १९८५ पासून शरद पवारनिष्ठ असा शिक्का बसलेल्या आणि शरद पवारांच्या प्रत्येक राजकीय भूमिकेत पाठराखण करणाऱ्या दिलीप सोपल यांनी २०१९ साली राष्ट्रवादी सोडली. सहा वेळेला आमदार आणि तीन वेळेला मंत्रीपद भुषविलेल्या सोपल यांच्या राजकीय जीवनात वर्तमानकाळ हा खडतर आहे. बार्शी विधानसभा मतदारसंघात १९९६ मध्ये उदयास आलेल्या राजेंद्र राऊत यांच्या नेतृत्वाने सोपल यांना आव्हान देत आज राजकीय नेतृत्व तसेच स्थान निर्माण केले आहे. गत विधानसभा निवडणुकीतील पराभवनानंतर राज्यात महाविकास आघाडीच्या माध्यमातून सरकार स्थापन झाल्यामुळे आणि उध्दव ठाकरे मुख्यमंत्री झाल्यामुळे सोपल गटाला नवसंजीवनी मिळाली होती. पण २०२४ च्या निवडणुका या राजकीय कसोटी पाहणाऱ्या ठरतील हे त्यांना माहित आहे. बार्शीचे विद्यमान आमदार राजेंद्र राऊत यांनीही भाजपामध्ये आपले स्थान निर्माण केले आह. त्यांच्यावर राज्यशासन हजारो कोटींच्या विशेष विकास निधीची मदत करते आहे. त्यामुळे प्राप्त राजकीय परिस्थितीमध्ये सोपल यांनी समविचारी मित्रांबरोबर जुळवून घेण्याचेच धोरण अंगीकारले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी शरद पवार गटाची सुत्रे हाती असलेल्या माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले यांच्याबरोबर त्यांचे मेतकुट जमले आहे. बार्शीमध्ये काँग्रेस फारशी मजबुत नसली तरी मुठभर कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन काम करत असलेल्या काँग्रेस शहराध्यक्ष विजय साळुंखे यांनाही त्यांनी आपलेसे करून घेतले आहे.

### आमदार राऊतांनी धूडकावली ऑफर

नुकत्याच झालेल्या धाराशिव लोकसभा मतदारसंघातील संभाव्य उमेदवार व आमदार आणि पदाधिकारी यांच्या बैठकीत भाजपा पक्षश्रेष्ठींची सर्वांबरोबर उमेदवार कोण याबाबत चर्चा झाली. या बैठकीत भाजपा पक्षश्रेष्ठींनी आमदार राऊत यांचा राजकीय अनुभव आणि तालुक्यातील ताकद व धाराशिव जिल्ह्यातील भुम, परंडा व अन्य विधानसभा मतदारसंघात असलेला संपर्क व प्रतिमा लक्षात घेऊन त्यांनाही लोकसभेची निवडणूक लढविण्याची ऑफर दिल्याचे समजते. मात्र ही ऑफर राजाभाऊ राऊत यांनी पुर्णपणे धुडकावून लावल्याचे व स्पष्ट शब्दात उमेदवारीचा इन्कार करत महायुती सांगेल त्या उमेदवाराला बार्शी विधानसभा मतदारसंघातून मोठे मताधिक्क मिळवून देवू असा विश्वास व्यक्त केल्याचे कळते.